॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

‘A’ Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि.०२) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्था यांच्या वतीने दिनांक ६ व ७ जानेवारी २०२६ रोजी “Advances in Chemical Technology and Allied Sciences” या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. रसायन अभियांत्रिकी व संलग्न विज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा व ज्ञानविनिमय हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभागृहात होणार आहे. उद्घाटनप्रसंगी पद्मश्री प्रा. डॉ. जी. डी. यादव हे प्रमुख पाहुणे, प्रा. डॉ. आर. डी. कुलकर्णी, कुलगुरू – मुंबई विद्यापीठ हे विशेष अतिथी तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी उपस्थित राहणार आहेत.

सदर परिषदेसाठी ३०० विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक उपस्थित राहणार असल्याची माहिती परिषद समन्वयक डॉ. राजकुमार शिरसाम व युआयसीटीचे संचालक डॉ. ए. के. गोस्वामी यांनी दिली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (दि.०२) प्रतिनिधी - कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे लिखित 'माय मराठी' या त्यांच्या ५६ व्या पुस्तकाचे प्रकाशन प्रशाळेतील मराठी विभागाची विद्यार्थिनी चेतना शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे उपस्थित होते. प्रा. म. सु. पगारे यांनी आतापर्यंत ५५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ५६ व्या 'माय मराठी' या पुस्तकात त्यांनी मराठी भाषा आणि साहित्याचा आढावा घेतलेला आहे. या पुस्तकात मराठी भाषेच्या उगमापासून ते मराठी वाङ्मयाचे प्रकार, साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह आणि या प्रवाहांमध्ये दिसणारा मानवतावाद कशा स्वरूपाचा आहे यावर विस्तृत प्रकाश टाकलेला आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या विद्वान आणि प्रसिध्द व्यक्तींच्या हस्ते करण्याऐवजी 'माय मराठी'च्या जतन आणि संवर्धनासाठी तयार होणाऱ्या पुढील पिढीतील विद्यार्थिनींच्या हस्ते आपण करावा, असे त्यांना वाटले आणि त्या संकल्पनेतून हा पुस्तक प्रकाशन सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी प्रशाळेतील डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीतो सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदाशिव, डॉ. भारती सोनवणे, नेहा लाम्हणे, पल्लवी बारी, भाग्यश्री लाखे, प्रशाळेतील प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार खेमराज पाटील यांनी व्यक्त केले.

**बातमी नं. २**

जळगाव (दि.०२) प्रतिनिधी कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे नववर्षा आगमनाप्रीत्यर्थ आणि ९ जानेवारी २०२६ रोजी होऊ घातलेल्या 'साहित्यातील मानवतावाद' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अनुषंगाने 'मानवतावाद' या विषयावरील भित्तीपत्रीकेचे विमोचन वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे उपस्थित होते.

मानवतावाद ही मानवाच्या सर्वकष कल्याणाचा विचार करणारी विचारधारा आहे. नववर्षाच्या निमित्ताने माणूस म्हणून सर्व माणसांना भयमुक्त जगता यावे, येणाऱ्या वर्षात माणसाचे जीवन अधिक नीतिमान आणि समृध्द व्हावे या सदिच्छा भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून व्यक्त करण्याची संकल्पना प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी व्यक्त केल्यानंतर संपादक मंडळाने तदनुषंगिक साहित्य संपादित करून भित्तीपतत्रिका तयार केली. या भित्तीपत्रिकेचे विमोचन वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अनिल डोंगरे यांनी केले. भित्तीपत्रिका तयार करण्यासाठी प्रा. डॉ. म. सु. पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, प्रीती सोनी, खेमराज पाटील, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे, चेतना शिंदे, भाग्यश्री लाखे, हर्षदा महाजन, स्वप्नील जाधव, निकिता ठाकूर, नेहा ठाकूर यांनी संपादक मंडळाचे काम पहिले. या कार्यक्रमावेळी डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीती सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, डॉ. भारती सोनवणे, नेहा लाम्हणे, पल्लवी बारी, प्राध्यापकेतर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी आणि प्रशाळेतील तिन्ही विभागांचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार खेमराज पाटील यांनी व्यक्त केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता